# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०१७ / श्रावण ९, १९३९ ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७६**

---

### सायन-पनवेल महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * ३३६४० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गासाठी शासनाने १९६५ साली संपादित केलेल्या तुर्भे येथील २ हेक्टर ८८ आर. या जमिनीतील शिल्लक राहिलेली १ हेक्टर ७० आर. ही जमीन शासनाने मुळ जमीन मालकाला परत केल्याची बनावट कागदपत्रे तयार करून पुण्यातील एका गुंतवणुकदारासोबत रूपये १५ कोटीचा व्यवहार करून फसवणूक केल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सायन-पनवेल महामार्गासाठी तुर्भे, जि.ठाणे येथील २.८८ हे.आर. एवढी जमीन Executive Engineer Reclamation विभाग, मुंबई यांच्या नावाने संपादित करण्यात आली. या जमिनीपैकी १.१८ हे.आर. एवढी जमीन सायन-पनवेल महामार्गासाठी वापरण्यात आली. उर्वरित १.७० हे.आर. एवढी जमीन Executive Engineer Reclamation विभाग, मुंबई यांच्या नावाने असतांनाही सदर जमिनीबाबत श्री.विजय पाटील व इतर ३८ यांनी MOU द्वारे श्री.अनुज उमेश गोयल, पुणे यांच्याबरोबर व्यवहार करुन फसवणूक केली, अशी तक्रार श्री.अनुज उमेश गोयल, पुणे यांनी विजय बाबू पाटील व इतर ३८ नवी मुंबई यांच्याविरुध्द केली आहे. तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, कक्ष-१, नवी मुंबई यांच्याकडे रुपये १ कोटीचा फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे. आजपावेतो सदर जमीन Executive Engineer Reclamation विभाग, मुंबई यांच्याच नावे आहे.

(२) व (३) या प्रकरणी जमीन ताब्यात असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी गुन्हा दाखल केलेला नाही तसेच त्यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. त्याचप्रमाणे उपरोक्त दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे या प्रकरणात शासनाचे कसलेही नुकसान झालेले नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर गुन्ह्याची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आशाणे ते ठाकूरवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * ३३८०६ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशाणे ते ठाकूरवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील आदिवासी भागातील रस्त्याचे मंजूर काम न करता हा निधी आशाणे गाव ते कल्याण कर्जत हायवे रस्त्यासाठी वापरुन उप अभियंता, कार्यकारी अभियंता व संबंधित ठेकेदार यांनी गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (जि.रत्नागिरी) येथे भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३) * ३२४७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाकडून दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी कृषी सहाय्यक या पदासाठी घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणी दोषींवर कारवाई करून परीक्षा पुन्हा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही,

तथापि, दिनांक ०४/०५/२०१७ रोजी अशा प्रकराची तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) शासन पत्र दिनांक ३०/०५/२०१७ अनुसार या प्रकरणी महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असून तो प्रतिक्षाधीन आहे. तथापि, महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतूदीनुसार डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीकडे प्राप्त झालेल्या श्री.नितीन दिनेश चौधरी यांच्या दिनांक २१/०३/२०१७ च्या प्राप्त तक्रारीस अनुलक्षून मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने चौकशी समिती नेमण्यात आली. चौकशी समितीच्या अहवालातील तक्रारीशी निगडीत कोणतेही तथ्य आढळून न आल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २५/०२/२०१५ मधील तरतूदीनुसार सदर तक्रार विद्यापीठ स्तरावरुन निकाली काढण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**गडचांदूर (जि.चंद्रपूर) मुख्य रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४) * ३३४६५ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगना राज्यास जोडणाऱ्या महामार्गातील गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहरातील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही, सद्यःस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सूस्थितीत आहे .

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा येथील सहापदरी राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(५) * ३३७१६ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरी कामामुळे साताराकडून पुण्याच्या दिशेने जुन्या महामार्गावरुन निघालेली वाहतूक लिबखिंडीत अडविण्यात आली असून ती उलट्या दिशेच्या सर्व्हिस रस्त्याने वळविल्याने वाहन चालकांचा गोंधळ होत असून त्यामुळे अपघात होऊन जिवितहानी झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर ठिकाणी दिशादर्शक फलक लावून सहापदरी रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे तसेच पोलीस अधिक्षक, सातारा यांनी कळविले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि सदर ठिकाणी सहापदरी मुख्य महामार्गाच्या दोन्ही बाजूस आधार भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूक पूर्ववत सुरु करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

**मौजे पोहेटाकळी (ता.पाथरी, जि.परभणी) येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत**

**(६) * ३३८३८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पोहेटाकळी (ता.पाथरी, जि.परभणी) येथील जायकवाडीसाठी संपादित जमिनीवर शासनाचे नाव न नोंदविल्याने त्या जमिनीवर बेकायदेशीररित्या अवैध प्लॉटींग काढून शासन मालमत्तेची लूट होत असल्याबाबत परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१६-१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त जमीन १५ वर्षापूर्वी संपादित केलेली असतांना जमिनीच्या ७/१२ वर नाव नोंदविण्याबाबत महसूल, पाटबंधारे व भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून अतिक्रमण करणाऱ्यांस सहकार्य करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) तहसिलदार पाथरी यांनी सदर प्रकरणी चौकशी केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२ परभणी यांनी दिनांक १५/४/२०१७ रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करून सदर जमिनीवर अतिक्रमणास प्रतिबंध केल्याचे कळविले आहे. या गटातील खरेदीविक्री आधारे घेण्यात आलेले फेरफार

चौकशी करून रद्द करणेसाठी व संपादीत क्षेत्राची नोंद ७/१२ उताऱ्यात घेण्याबाबत प्रस्ताव तहसिलदार, पाथरी यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच शेत जमिनीची नोंद घेण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील मत्स्यव्यवसाय प्रोत्साहनाकरीता जागा देण्याबाबत**

**(७) * ३१३९९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील मत्स्यव्यवसाय प्रोत्साहनाकरीता झिरो माईल परिसरातील १२ हजार ५०० चौ. फुट जागेपैकी ९ हजार ५०० चौ.फुट जागा मत्स्य व्यवसाय संघटनेला देण्यात आली असता सदर जागा परत घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिल्याचे दिनांक ५ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मत्स्य व्यवसायाकरीता दिलेली जागा परत घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मत्स्य व्यवसायाकरीता दुसरी जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे सिताबर्डी येथील खसरा क्र. २८२ नगर भूमापन क्र. १८५३ व १८५४ येथील आराजी ३४९.६० चौ.मी. जागा विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघ मर्या., नागपूर यांना लिजवर मंजूर करण्यात आली होती.

परंतु विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघ मर्या., नागपूर यांनी उक्त जमीन मत्स्यव्यवसाय व तद्‌संबंधी प्रयोजनार्थ न वापरता अनधिकृतपणे इतर व्यक्तींना भाड्याने वाणिज्यिक वापराकरिता व मुलांचे वसतिगृह इत्यादींसाठी देवून अनधिकृत वापर केल्याचे आढळून आले. सदर संस्थेने केलेल्या शर्तभंगामुळे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक २३/०२/२०१७ च्या आदेशान्वये उक्त जमीन शासन जमा करण्याचे आदेश दिले आहेत व अप्पर आयुक्त,

नागपूर यांनी दिनांक १५/०३/२०१७ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दिनांक २३/०२/२०१७ चे उक्त आदेश कायम केले आहेत. सदर आदेशाविरुद्ध उक्त संस्थेने मा.महसूल मंत्री यांचेकडे अपील दाखल केले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर संस्थेने वाणिज्यिक वापराकरीता भाड्याने दिलेल्या गाळेधारकांनी मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे रिट पिटीशन क्रमांक १२३५/२०१७ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील भूमि अभिलेख कार्यालयातील कामे विहित मुदतीत होत नसल्याबाबत**

**(८) * ३२११२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडून मालमत्ता नोंदीची कामे विहित वेळेत होत नसल्याबाबतच्या तक्रारी नागरिकांनी शासनाकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांची कामे विहित मुदतीत न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, जिल्हा भूमि अभिलेख कार्यालयातील कामे विहित मुदतीत होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी उप अधिक्षक भूमि अभिलेख, यवतमाळ कार्यालयात माहे मे, २०१७ अखेर एकूण ४२९ फेरफार नोंदीची प्रकरणे प्रलंबित होती. दिनांक ०६/०७/२०१७ पर्यंत त्यापैकी ४२४ प्रकरणांमध्ये रितसर फेरफार मंजुरीची प्रक्रिया करून ती प्रकरणे निकाली काढण्यात आली असून केवळ ५ तक्रारी फेरफार नोंदी आक्षेपांमुळे प्रलंबित आहेत.

उप अधिक्षक भूमि अभिलेख, यवतमाळ कार्यालयात परिरक्षण भूमापकांची संख्या कमी असल्याने शिल्लक फेरफारांची संख्या वाढली होती. मात्र जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यवतमाळ यांनी त्यांच्या अधीनस्त कार्यालयातील कामाचा आढावा घेऊन ४ परिरक्षण भूमापक/ निमतानदार यांच्या सेवा उप अधिक्षक भूमि अभिलेख, यवतमाळ, पुसद व वणी या कार्यालयांकडे वर्ग केल्या असून अशा प्रकारे प्रलंबित कामाचा निपटारा करण्याची तजवीज केली आहे.

---------------

**कामोठे (नवी मुंबई) येथील मौजे घोटगावातील शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत**

**(९) * ३११९७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (नवी मुंबई) येथील मौजे घोटगावातील शेतकऱ्यांची ८० एकर जमीन कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या नावाखाली विकासकांकडे सुपूर्द करण्याचा प्रयत्न शासन करीत असल्याची तक्रार तहसिलदार, पनवेल यांचेकडे गावकऱ्यांनी केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मौजे घोटगाव येथील शेतकऱ्यांना न्याय देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) उक्त तक्रारीमध्ये नमूद केलेल्या ८० एकर क्षेत्रापैकी मौजे घोट येथील स.नं. ३१, १०, ७, ३३, १५ क्षेत्र कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राखीव असून, सदरचे क्षेत्र खाजगी विकासकांना देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच स.नं. ६५ येथील क्षेत्र खाजगी मालकीचे असल्याचे दिसून येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात बोगस खतांची विक्री केली जात असल्याबाबत**

**(१०) * ३३७४७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सेंद्रिय खताच्या नावाखाली बेकायदेशीरपणे बोगस खताची विक्री केली जात असल्याचे कृषी विकास अधिकारी यांच्या पथकास माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विकास अधिकारी यांच्या पथकाने संबधितांची शुल्क चौकशी करून कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे दोषींना शासन पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस खत विक्रेत्यांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) दिनांक ०२/०६/२०१७ रोजी, सावरगांव-परसोडी बु.ता.कळंब, जि.यवतमाळ परिसरात काही तरूण बेकायदेशीरपणे भूसुधारकांची विक्री करत असल्याचे कृषी विकास अधिका-यांच्या पथकास आढळून आले, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कृषी विकास अधिकाऱ्यांच्या पथकाने केलेल्या चौकशीत चौधरी ॲग्रोटेक (I) प्रा.लि. प्रगती पार्क जलालखेडा ता.जि.नागपूर उत्पादित ३९ बॅग भूसुधारकांचा बेकायदेशीर साठा आढळून आला. सदर साठा जप्त करण्यात आलेला असून त्याचा नुमना काढून विश्लेषणासाठी रासायनिक खत प्रयोगशाळा अमरावती, यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यासंदर्भातील अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार संबंधितांवर खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये कारवाई करण्यात येईल
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामपूर (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील जंगलव्याप्त गावांमध्ये जनावरांची अवैध खरेदी होत असल्याबाबत

**(११) * ३२९६० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामपूर (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील जंगलव्याप्त गावांमध्ये अनेक वर्षापासून जनावरांचा अवैध बाजार होत असून या बाजारात खरेदी करण्यात येणाऱ्या जनावरांची कत्तलखान्यांकरीता खरेदी होत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध बाजाराबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मौजे देवडे-वाडीअधिष्ठी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याबाबत

**(१२) * ३३४१२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवडे-वाडीअधिष्ठी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे साखरपा-देवडे रस्त्यालगत शाळा देवडे क्र.१ चा पूर्वापार गेट अडवून बांधण्यात आलेली खाजगी एस.टी. निवारा शेड तसेच अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक ३१/८/२०१६ व दिनांक १८/५/२०१७ रोजी वा त्यासुमारास कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार अद्यापही अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले नसल्यामुळे संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय खरे आहे.

(२) सदरचे तात्पुरते एस.टी. निवारा शेड हटविण्याबाबत ग्रामपंचायत, देवडे यांना दिनांक २०/१०/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून, या प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषी विभागातील कृषी सेवकांच्या परिक्षेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१३) * ३१३४९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६८७५ ला दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्यावतीने ७३० कृषी सेवक पदांच्या भरतीसाठी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून उक्त प्रकरणातील दोषींवर कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी परीक्षेत गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याऐवजी निवड झालेल्या विद्‌यार्थ्यांवरच निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

कृषी विभागाच्यावतीने ७३० कृषी सेवक पदांच्या भरतीसाठी दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकरणात प्रथमदर्शनी दोषी आढळून आलेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे प्रथम वर्दी अहवाल (FIR) दाखल करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) परीक्षेच्या निकालानंतर सदर परीक्षेत गैरप्रकारांचा अवलंब झाल्याबाबत परीक्षार्थींनी विविध माध्यमांतून तक्रारी केलेल्या होत्या. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त (कृषी) तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार परीक्षेसंदर्भातील गंभीर त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

सदर प्रकरणात प्रथमदर्शनी दोषी आढळून आलेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी प्रथम वर्दी अहवाल (FIR) दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

**पालघर जिल्हयात शेतकऱ्यांनी पीक काढून झाल्यानंतर कृषी विभागाकडून किटकनाशकांचे वाटप करण्यात आल्याबाबत**

**(१४) * ३२२३३ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात शेतकऱ्यांना रब्बी हंगामात पिकांवर वापरण्यात येणारी किटकनाशक औषधे पीक काढून झाल्यानंतर कृषी विभागाकडून दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणात दोषी असलेल्या संबंधित कृषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही, सदर किटकनाशके हरभरा पिकासाठी जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील शालेय बसची वाहन योग्यता तपासणी पूर्ण न झाल्याबाबत**

**(१५) * ३२३५२ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २५६६५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेय बसची करण्यात येणारी वाहन योग्यता तपासणी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे पूर्ण न झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शालेय बसची वाहन योग्यता तपासणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) शाळांच्या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत स्कूल बसेसची पुनर्तपासणी करण्याच्या विशेष तपासणी मोहीमेमध्ये पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत एकूण 3,680 बसेसपैकी 2,510 बसेसची पुनर्तपासणी करण्यात आलेली आहे.

(२) उर्वरीत स्कूल बसेसची तपासणी करण्याबाबत जिल्हा शालेय विद्यार्थी वाहतूक सुरक्षितता समितीच्या बैठकीमध्ये शिक्षण विभाग व स्कूल बस संघटनाच्या प्रतिनिधींना स्कूल बसेसची तात्काळ पुनर्तपासणी करण्याबाबत सूचित केले आहे. तसेच, त्याकरिता विशेष तपासणी मोहीम देखिल राबविण्यात आलेली आहे. तपासणीसाठी न आलेल्या स्कूल बसेससाठी मोटार वाहन कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यात बुलडोझराचा वापर करुन ग्रामस्थांसाठी असलेल्या सोयी-सुविधा नष्ट केल्याबाबत**

**(१६) * ३२४७२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी उत्पन्नाखालील जमिनी खाजगी क्षेत्रातील लोकांना विक्री केल्याने अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पाईप व रस्त्याची वाहतुकीच्या दृष्टीने नुकसान होत असल्याबाबतची तक्रार तहसिलदार, कर्जत यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी खरेदीदारांनी बुलडोझरचा वापर करून ग्रामस्थांसाठी असलेल्या सोयी-सुविधा नष्ट केल्याने परिसरातील ग्रामस्थ याबाबत आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय योजनांचे नुकसान करणाऱ्या जमीन मालकांकडून नुकसान भरपाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामपंचायत कोल्हारे यांनी तहसिलदार, कर्जत यांना दिनांक २३/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील नेरळ विकास प्राधिकरण हद्दीत अनेक बिल्डरांच्या इमारतींचे बांधकाम जिल्हा परिषद प्राधिकरणाच्या परवानगीने चालू असून, अनेकांनी भराव टाकले असून, पावसाचे पाणी येण्या-जाण्यासाठी नाला/वाट ठेवली नसल्यामुळे पावसाळ्यात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे, याबाबत योग्य ती समज देऊन कार्यवाही करणेबाबत कळविले आहे, तसेच, ग्रामपंचायत कोल्हारे यांनी संबंधित विकासकांना आवश्यक कार्यवाही करण्यासाठी कळविले आहे.

(२), (३) व (४) तहसिलदार, कर्जत यांचे कार्यालयाच्या दिनांक ०७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नेरळ विकास प्राधिकरण यांना विकासकांनी अनधिकृत भराव टाकून बूजविलेल्या नाल्याच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच, दिनांक १०/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विकासकांविरुध्द नियमानुसार कारवाई करणेबाबत ग्रामपंचायत कोल्हारे यांना कळविण्यात आले आहे.

आणि, जिल्हा परिषदेच्या दिनांक २४/०७/२०१७ रोजीच्या आदेशान्वये ग्रामपंचायत कोल्हारे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी कार्यकारी अभियंता (बांधकाम), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प. रायगड व सहायक संचालक नगररचना रायगड यांच चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असून, चौकशी समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**अहमदनगर जिल्हयातील शेतकरी अपघात विमा योजनेतील प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) * ३४१६८ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत ३४ प्रस्ताव माहे मार्च, २०१७ अखेर ना मंजूर करण्यात आले असून १०२ शेतकऱ्यांचे प्रस्ताव विमा कंपन्याकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांस या योजनेचा आर्थिक लाभ मिळण्याकरीता नामंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावातील त्रुटी दूर करून उक्त प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) मार्च २०१७ अखेर सन २०१५-१६ मधील अहमदनगर जिल्ह्यातील २७५ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आले होते. त्यापैकी १५५ प्रस्ताव विमा कंपनीकडून मंजूर झाले होते. ७२ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत होते व ४८ प्रस्ताव योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्यामुळे नाकारण्यात आले होते.

सन २०१६-१७ मधील ८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी १ प्रस्ताव मंजूर झाला होता. ६ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत होते व १ प्रस्ताव योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्यामुळे विमा कंपनीकडून नाकारण्यात आला होता.

(२) विमा कंपनीकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांबाबत जिल्हा, विभाग, कृषी आयुक्तालय व राज्यस्तरावर नियमितपणे आढावा घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रकरणांमधील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष कॅम्प घेण्यात येत आहेत. प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कंपनीस वेळोवेळी पत्र, तसेच नोटीस देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**"जय महाराष्ट्र" असे लिहिलेली बस बेळगावात दाखल होताच कर्नाटक पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याबाबत**

**(१८) * ३१४६४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसवर "जय महाराष्ट्र" असे लिहिलेली पहिली बस बेळगावात दिनांक ३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेऊन जाणाऱ्या चालक आणि वाहकासह २० प्रवाशांवर कर्नाटक पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्यातील जनतेकडून संताप व्यक्त केला जाऊन तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणती प्रतिक्रिया नोंदविली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्तव्यावरील चालक व वाहक यांचेवर कर्नाटक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र बसमधील प्रवाशांवर गुन्हे दाखल केलेले नाहीत.

(२), (३) व (४) या घटनेपूर्वी बेळगांव येथे मा.मंत्री, नगर विकास, कर्नाटक शासन यांनी कर्नाटक राज्यातील लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक कार्यक्रमात तसेच सभागृहात "जय महाराष्ट्र" उच्चारल्यास त्यांचे पद रद्द करण्याचा कायदा करणार असल्याचे वक्तव्य केल्याचे निदर्शनास आल्याने त्याची महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतली असून त्यासंदर्भात महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचे मा.समन्वयक

मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी दिनांक २३/०५/२०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाची नाराजी कर्नाटक शासनास कळविलेली आहे. तसेच सीमा प्रश्नाच्या अनुषंगाने राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दावा क्र.४/२००४ दाखल केलेला आहे. या न्यायालयीन प्रकरणी राज्य शासनाने नामांकित वकीलांची नेमणूक केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील भाकड जनावरांच्या पोषणासाठी दरमहा भत्ता सुरु करण्याबाबत**

**(१९) * ३२२६७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५१६९ ला दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाकड जनावरांसाठी शासनाने रुपये तीन हजार दरमहा भत्ता द्यावा या मागणीसाठी एका राजकीय पक्षाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी महिलांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनातील मागण्या काय आहेत,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांच्या पोषणाबाबत तसेच, निवेदनातील मागण्यासंदर्भात शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) गोवंश हत्याबंदी अंतर्गत भाकड गाई आणि तत्सम जनावरे यांचे पालन पोषण करणे शेतकऱ्यांस अवघड झाले आहे. आधीच शेतकरी कर्जबाजारी त्यात या जनावरांच्या प्रश्नामूळे त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. सबब एका जनावरांस एका दिवसाचा न्युनतम खर्च रुपये १००/- येतो. शेतकऱ्यांचा कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने भाकड जनावरांच्या संगोपनाकरीता मदत करावी अशी मागणी केली आहे.

(३) राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ ग्रामीण जिल्ह्यात गोवंशाचा सांभाळ (भाकड गाई, अनुत्पादक/ निरुपयोगी बैल, वळू इ.) करण्याकरीता गोशाळांना अर्थसहाय्य देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" ही नवीन योजना राबविण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार गोशाळांचे बळकटीकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद प्र.रा.मा.क्र. २ या चौपदरी रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत**

**(२०) * ३१८६६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद प्र.रा.मा.क्र. २ या चौपदरी रस्ता कि.मी. १७९/०० ते २२८/४०० या दरम्यान खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ व माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा स्वरुपाची मागणी प्राप्त झाली आहे. तथापि, पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद प्र.रा.मा.क्र.२ या रस्त्याच्या कि.मी.१७९/०० ते २२८/४०० किमी लांबीपैकी सा.क्र.१७९/०० ते २११/५०० किमी मध्ये जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ मधील अतिवृष्टीमुळे किरकोळ स्वरुपात खड्डे पडले होते. या रस्त्याची दुरवस्था झाली होती, हे खरे नाही. सदर लांबीत डांबर मिश्रित खडीने खडडे भरुन पूर्ण लांबीतील रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत करण्यात आला आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अर्थसंकल्पात मंजूर असून निविदा प्रक्रिया स्तरावर आहे व निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम पूर्ण करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कांकबा, खंडाळा व वडगांव (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) या भागातील शेत जमीन खडीकेंद्रामुळे नापिक होत असल्याबाबत**

**(२१) * ३३७१० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांकबा, खंडाळा व वडगांव (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) या भागात सुरू असलेल्या खडीकेंद्रामुळे हजारो हेक्टरवरील जमीन धोक्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खडीकेंद्रातून येणारी धुळ जमिनीवर पडून जमीन नापिक होण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे हे खडीकेंद्र बंद करावे किंवा बाहेर पडणाऱ्या धुळीचा विल्हेवाट लावावी या मागणीसह या भागातील शेतक-यांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि सदर खडीकेंद्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्राविना (consent to operate ) तसेच पुरेशा हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणा न लावता चालू असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर खडीकेंद्रास दिनांक १९/०७/२०१७ रोजी कारखाना बंद करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कसारा-नाशिक राज्य परिवहन मंडळाची बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(२२) * ३२१२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (जि.ठाणे) रेल्वे स्थानकाबाहेर अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्यामुळे कसारा-नाशिक ही राज्य परिवहन मंडळाची बससेवा शहापूर आगाराने बंद केली असल्याचे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात असताना बससेवा बंद केल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कसारा-नाशिक बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या शहापूर आगाराकडून चालविण्यात येणाऱ्या ११ फेऱ्यांपैकी ८ फेऱ्या दिनांक ०५/०५/२०१७ रोजी तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आल्या होत्या, सदरच्या फेऱ्या दिनांक ०६/०५/२०१७ पासून पुर्ववत सुरु करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत कसारा ते नाशिक मार्गावर महामंडळाद्वारे ५९ फेऱ्या चालनात असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय झालेली नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील गौण खनिजांचे अवैध उत्खनन रोखण्याबाबत**

**(२३) * ३१०६३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७७६५ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात व गिरणा नदीपात्रात अनधिकृत बेकायदा होणारा अमर्याद वाळूचा उपसा रोखण्याकरिता तसेच मालेगांव तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी मंडळनिहाय १० भरारी पथकांची नेमणुक करण्यात आलेली असतानाही अवैध वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदनपुरी शिवारात (ता.मालेगांव, जि.नाशिक) दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीने ॲपे रिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षातील एका चौदा वर्षाच्या शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असणे तसेच गिरणा नदीपात्रात अमर्याद वाळू उपसामुळे मोठे खड्डे पडून नदीपात्राच्या खोलीत वाढ होवून पाण्याचा अंदाज न आल्याने अनेक तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्यामुळे अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी सर्व मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांना निर्देशित केल्यानंतरही वाळू माफियांचे वर्चस्व सुरूच असून अवैधरित्या अमर्याद वाळू उपसा व वाळू विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध गौण खनिज उत्खनन व अमर्याद वाळू उपसा रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस पडली आहेत. मालेगाव तालुक्यात गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी मंडळनिहाय १० पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर पथकांमार्फत मालेगाव तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५ प्रकरणांमध्ये कारवाई करून रूपये १,३३,४७५/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील चंदनपुरी शिवारात दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वाळू वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरने रिक्षाला धडक दिल्याने तेरा वर्षाच्या एका मुलाचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी संबंधित ट्रॅक्टर चालकाविरूद्ध किल्ला पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तहसिलदार मालेगाव यांनी संबंधित ट्रॅक्टर मालकाविरूध्द दिनांक १३/०७/२०१७ रोजी वाळूच्या अवैध वाहतूकीप्रकरणी रूपये २६,६९५/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत नोटीस बजावली आहे.

गिरणा नदीपात्रात दिनांक २५/१२/२०१६ रोजी ३ तरूणांचा बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. सदर नदीपात्रात माहे जून, २०१६ ते माहे जानेवारी, २०१७ दरम्यान पाण्याचा प्रवाह असल्याने, त्यादरम्यान सदर नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रभागा नदीपात्रातील (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) अवैध वाळू उपसा बंद करण्याबाबत

**(२४) * ३३८१६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा नदीपात्रात (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) वाळू उपसा न करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असतांना नदीपात्रात अवैध वाळू उपसा केल्यामुळे नदीपात्रात पडलेल्या खड्यामुळे दिनांक १० जून, २०१७ रोजी पंढरपूर शहरातील चार बालकांचा व दिनांक १२ जून, २०१७ रोजी एका वृध्दाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच, अवैध वाळू उपसा बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मा.राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या दिनांक १०/०३/२०१७ रोजीच्या आदेशानुसार सोलापूर जिल्हयातील चंद्रभागा नदी पात्रातील वाळू उपसा बंद आहे.

सदर नदीपात्रात दिनांक १०/०६/२०१७ रोजी पाण्यात पोहत असताना ०४ बालकांचा बुडून मृत्यू झाल्याचे तसेच दिनांक १२/०६/२०१७ रोजी एका वृध्दाचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, सदरची घटना घडलेल्या ठिकाणी वाळूचे उत्खनन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सोलापूर जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्याकरीता उपविभागीय स्तरावर तसेच तहसील स्तरावर महसूल विभाग व पोलीस विभागाचा समावेश असलेली भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. सदर भरारी पथकांमार्फत पंढरपूर तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत वेगवेगळ्या प्रकरणांत कारवाई करून रूपये १८,७८,७७१/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आला आहे. तसेच १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील निजाम आणि ब्रिटीशकालीन पुलांची दुरूस्ती करण्याबाबत**

**(२५) * ३१३०० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील सावित्री नदीवरील (मुंबई-गोवा महामार्गावर) पूल दुर्घटनाग्रस्त झाल्यानंतर शासनाने राज्यातील पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण (सर्वेक्षण) करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील निजाम आणि ब्रिटीशकालीन पुल धोकादायक व नादुरूस्त झाले असून बीड शहरातील बिंदुसरा नदीवरील (सोलापूर-औरंगाबाद महामार्गावरील) पुल धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करून पुलाची दुरूस्ती व नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सोलापूर-औरंगाबाद राष्ट्रीय महामार्ग २११ (नवीन ५२) वरील बीड शहरातील बिंदुसरा नदीवरील पूल धोकादायक झाला आहे, हे खरे आहे.

(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या सोलापूर-औरंगाबाद रा.म.मा. २११ च्या येडशी ते औरंगाबाद ह्या भागाच्या खाजगीकरणामधून प्रगतीत असलेल्या चौपदरीकरणाच्या प्रकल्पामध्ये बिंदुसरा नदीवर नवीन पूल बांधण्याचे काम समाविष्ट करण्यास दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी मान्यता मिळाली असून सविस्तर अंदाजपत्रकानुसार सवलतकाराकडून बांधकाम हाती घेण्यात येणार आहे तसेच बिंदुसरा नदीवरील पूल सध्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून पुलावरील वाहतूक तात्पुरत्या रस्त्यावरुन वळविण्यात आली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२६) * ३१२६९ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा पिकाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या नुकसानीबाबत सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) माहे मे, २०१७ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या फळपिकांचे नुकसानीबाबतचे पंचनामे करण्यात आले असून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे रायपटण (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथील राज्य महामार्गावरील धोकादायक झाडांमुळे होणारे अपघात टाळण्याबाबत**

**(२७) * ३१८४८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रायपाटण (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथील ओणी-अणुस्कुरा या राज्य महामार्गावरील टक्केवाडी येथील झाड दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास ट्रकवर पडल्यामुळे ट्रकचा क्लिनर मरण पावला तर वाहनचालक जखमी झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर राज्य महामार्गावरील झाडे धोकादायक झाली असल्याबाबतची तक्रार ग्रामपंचायत, रायपाटण यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गावरील धोकादायक झाडांमुळे होणारे अपघात रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. रायपाटण ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्याच्या बाजूची विद्युत वाहिनीला फांदी लागणारी झाडे तोडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उप विभाग, राजापूर यांच्या दिनांक ८/५/२०१७ च्या पत्रानुसार, ग्रामपंचायत रायपाटण यांच्या मागणीनुसार विद्युत वाहिनीला लागणाऱ्या फांद्या तोडण्यास ग्रामपंचायतीस परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) ओणी अणुस्कुरा या रस्त्याच्या बाजूच्या धोकादायक झाडाचे सर्वेक्षण करण्यात आले असून, वनखात्यामार्फत मुल्यांकनाचे काम प्रगतीत आहे. त्यानंतर, सदरहू झाडे तोडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद ते अजिंठा या राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(२८) * ३३५९६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरापासून अजिंठा या पर्यटन स्थळाला जोडणाऱ्या राज्यमार्गाचे चौपदरीकरणाबाबत अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यमार्ग चौपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग ७५३ फ च्या औरंगाबाद-सिलोड-फर्दापूर हया १०० कि.मी. रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण व प्रमुख गावांमध्ये चौपदरीकरणाच्या कामासाठी दोन पॅकेजमध्ये कंत्राटदारासोबत करारनामा झाला असून मे २०१९ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हया लांबीमध्ये औरंगाबाद-अजिंठा हया महामार्गाचा समावेश आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील तारामुंबरी पुलाच्या जोडरस्त्याच्या कामाबाबत**

**(२९) * ३४०४४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील तारामुंबरी पूलाच्या जोडरस्त्याच्या कामाला निधीची उपलब्धता होऊनही अद्याप सदर रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे मिठमुंबरी येथील ग्रामस्थांनी दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जोडरस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघात रोखण्याबाबत**

**(३०) * ३१७७३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २७२६७ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या अपघात दोन जणांचा मृत्यू झाला, दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी भातान बोगद्याजवळ झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला, दिनांक ७ मे, २०१७ रोजी कामशेत बोगद्यात झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला व दिनांक ३ जून, २०१७ रोजी लोणावळ्यानजिक झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला व अनेकवेळा या महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे जून, २०१६ मध्ये झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार यासंदर्भात सर्व बाबींचा आढावा घेऊन अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली वाहतूक पोलीस, परिवहन व माहिती तंत्रज्ञान विभागाचे सदस्य याची समिती गठीत करण्यात आली असून सदरहू समितीने अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. परंतु मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या अपघातांच्या नोंदीनुसार दिनांक १५/०४/२०१७ रोजी १ व्यक्ती मृत, १ व्यक्ती गंभीर जखमी, दिनांक १९/०४/२०१७ रोजी ३ व्यक्ती मृत, १ गंभीर जखमी, १ किरकोळ जखमी, दिनांक ०७/०५/२०१७ रोजी ५ व्यक्ती मृत, ४ किरकोळ जखमी व दिनांक ०३/०६/२०१७ रोजी १ व्यक्ती मृत, ५ गंभीर जखमी आहेत.

अपघातामुळे काही कालावधीसाठी वाहतूक कोंडी होत असते.

(२) होय.

(३) सदर गठित समितीने शासनास इंटेलिजन्स ट्राफीक मॉनिटरींग सिस्टीम मंजुरीसाठी विचार करावा म्हणून दिनांक २७ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत :-

१. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ किंवा परिवहन आयुक्त यांना प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमण्यात यावे.
२. आर्थिक तरतुद उपलब्ध करावी.
३. प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी MSRDC, Motor Vehicle Department, ADGP, (Traffic) and DIT यांची प्रकल्प मॉनिटरींग कमिटी करावी.
४. KPMG यांची या प्रकल्पाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करावी.

सदर शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती-सुरत या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम करण्याबाबत**

**(३१) * ३४००६ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४३१९ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-सुरत या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम दोन वर्षापूर्वी उद्‌घाटन होऊनही अत्यंत संथगतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाच्या कामाकरिता नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराला हे काम सन २०१९ पर्यत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महामार्गावरील अपघाताचे वाढते प्रमाण पाहता महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अमरावती सुरत राष्ट्रीय महामार्गापैकी अमरावती ते चिखली ह्या १९४ कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाचे भूमिपूजन ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी करण्यात आले होते. सदरील चौपदरीकरणाच्या कामाचा करारनामा दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी करण्यात आला असून करारनाम्यानुसार मे, २०१९ पर्यंत काम पूर्ण करणे अपेक्षित असून सद्य:स्थितीत सुमारे १० टक्के काम झाले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.
(३) सदरील प्रकल्प केंद्र शासनामार्फत राबविला जात असल्याने राज्य शासनाकडून कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयात महत्वाची कार्यालये स्थापन करण्याबाबत**

**(३२) * ३२३०५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाची निर्मिती होऊन तीन वर्षाचा कालावधी होऊनही ३० कार्यालये स्थापन झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयात सदर तीस कार्यालये लवकरात लवकर स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) पालघर जिल्हयातील जनतेच्या गरजेची व दैनंदिन कामकाजाशी संबधित ३१ कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. उर्वरीत कार्यालये स्थापन करण्याबाबत संबंधित विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्मित पालघर जिल्हयाच्या समस्यांसंदर्भात दिनांक १८/११/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी नवनिर्मित पालघर जिल्हयांकरीता महत्वाची नवीन कार्यालये प्राधान्यक्रमानुसार सुरु करण्यात यावीत असे सर्व संबंधित विभागांना निदेश दिले आहे.

-----------------

**राज्यातील महानंद दूध उत्पादनाचा प्रकल्प सुरू करण्याबाबत**

**(३३) * ३३१७८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानंदाची दही, ताक, लस्सी, मसाला दुधासारख्या उत्पादनाची मोठया प्रमाणात मागणी वाढल्यामुळे डेअरीने रूपये २० कोटी खर्चून २० टन क्षमतेचा दही, ताक, लस्सी तयार करणारा अत्याधुनिक प्रकल्प उभारला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत स्वीडनच्या तंत्रज्ञानावर आधारीत उभारुन त्याचे काम माहे मार्च अखेर पूर्ण होऊनही उद्घाटनाअभावी ताक, दही, लस्सी सारख्या सह उत्पादनाचे उत्पादन होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ म. (महानंद) यांना दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती प्रकल्पाच्या आधुनिकीकरणासाठी रुपये १६.०० कोटी रक्कमेचा प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मंजूर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पातील मशीनरी बसवण्याचे काम मार्च, २०१७ अखेरीस पूर्ण करण्यात आले असून, प्रकल्पाचे ऑटोमेशनचे काम पूर्ण करुन मशीनरी सुरु करणे, मशीनचे संपूर्ण क्लिनींग (CIP) करणे व ट्रायल रन घेणे ही कामे माहे एप्रिल, २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आली. सदर प्रकल्पातून पहिल्या टप्प्यात लस्सी व ताकाचे उत्पादन सुरु केले असून, माहे मे, २०१७ मध्ये ४७.५ मे.टन ताक व १९ मे.टन लस्सीचे उत्पादन असे एकूण ६६.५ मे.टन उत्पादन घेण्यात आले आहे.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) शासकीय विश्रामगृहाच्या बांधकामाबाबत

**(३४) * ३२२८८ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दोन वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेले शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विश्रामगृहाचे बांधकाम बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बांधकाम पूर्ण क्षमतेने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील शासकीय विश्रामगृहाचे स्थापत्य व विद्युतीकरणाचे काम पूर्ण झालेले असून फर्निचरचे काम निविदास्तरावर आहे. फर्निचर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत असून निविदा निश्चितीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. ही कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांनी विरोध केल्याबाबत**

**(३५) * ३१२२२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.नारायण राणे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २६९९५ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या शेतजमीन व फळबागायतीचे अधिग्रहण करण्यात येणार असून उक्त समृध्दी महामार्गासाठी बागायती, फळबागायतींच्या जमिनी देण्यास होणारा शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी शासन पोलीस बळाचा वापर करीत असून फळेगाव (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे समृध्दी महामार्गासाठी विरोध करणाऱ्या १६ शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत तर शिवडे (ता.सिन्नर, जि.नाशिक) गावातील ४२ शेतकऱ्यांना शेतात जाण्यास प्रतिबंध करून नोटीस बजावल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबादसह १० जिल्हयातील ५० पेक्षा अधिक गावांमधून समृध्दी महामार्गास शेतकऱ्यांकडून विरोधी केला जात असून त्याबाबतची निवेदने शासनास सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गास विरोध केलेल्या शेतकऱ्यांच्या निवेदनातील मागण्यांचे स्वरूप काय आहे, तसेच मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी एकूण किती जमिनींचे भूसंपादन करण्यात येणार आहे व त्यामुळे किती गावकरी/शेतकरी बाधित होणार आहेत तसेच त्यांना कशाप्रकारे मोबदला देण्यात येणार आहे व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी पोलीस बळाचा वापर करण्यात आला हे खरे नाही.

मात्र महामार्गासाठी लागणाऱ्या जमिनीच्या संयुक्त मोजणीच्या शासकीय कामात अडथळा करणाऱ्या ठाणे जिल्हयातील १२ व नाशिक जिल्हयातील शिवडी गावातील ४० इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) शेतकऱ्यांनी या प्रकल्पाबाबत विविध निवेदने दिली आहेत. उक्त निवेदनामध्ये शेतकऱ्यांनी जमीन एकत्रिकरण योजनेतील लाभाऐवजी एक रकमी मोबदला अदा करणे, सध्या अस्तित्वात असलेल्या नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करणे, संपादित जमिनीस चालू बाजारभावाप्रमाणे मोबदला अदा करणे, पर्यायी शासकीय जमीन देऊन पुनर्वसन करणे, प्रकल्पबाधितांना शासकीय नोकरी देणे, महामार्गाच्या आखणीमध्ये बदल करणे, महामार्ग रद्द करणे, इत्यादी तत्सम स्वरूपाच्या मागण्या केल्या आहेत.

महामार्गाच्या आखणीमध्ये १० जिल्हयातील ३९२ गावांतील साधारणत: ९,०३० हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. त्यापैकी ३७१ गावांतील जमिनींची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. भूमि अभिलेख विभागामार्फत संयुक्त मोजणी नकाशे व संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त होताच जमीन संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या निश्चित होईल.

शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ मधील निर्देशानुसार खाजगी क्षेत्रातील जमीन जमीनमालक यांच्या संमतीने खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी भूसंपादन कायदा, २०१३ च्या कलम २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार जमीन व त्यावरील घटकांकरीता परीगणित होणाऱ्या एकूण मोबदल्यावर वाढीव रक्कम दिली जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड-पंढरपूर रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(३६) * ३३५५७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड-पंढरपूर हा राज्य महामार्ग रस्ता एकपदरी असून त्याचे चौपदरीचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर महामार्ग रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाड-पंढरपूर रस्ता (प्र.रा.म-.१५) हा रत्नागिरी, रायगड, पुणे, सातारा व सोलापूर अशा पाच जिल्हयातून जातो. सातारा जिल्हयातील शिरवळ-लोणंद-फलटण ५६ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण खाजगीकरणांतर्गत हाती घेतले आहे. त्यापैकी ४३ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले असून १३ कि.मी. लांबीचे काम भुसंपादनाअभावी अपूर्ण आहे. महाड-पंढरपूर रस्त्याच्या उर्वरित लांबीमध्ये चौपदरीकरणाचे काम मंजूर नाही.

(२) व (३) भुसंपादनामुळे कामास विलंब झाला आहे. शिरवळ-लोणंद ही लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मंजूर आहे व लोणंद-फलटण ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ म्हणून घोषित झाली आहे. सदर लांबी राष्ट्रीय महामार्ग विभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## पश्चिम महाराष्ट्र व नाशिक जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(३७) * ३०९७० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र व नाशिक जिल्ह्यात दिनांक ३० एप्रिल, २०१७, दिनांक २, ३ मे, २०१७ व दिनांक ३ जून, २०१७ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वारे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, बागायतदारांचे व घरांचे नुकसान होऊन जिवित व वित्तहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वंधाने व करंजाड (ता.सटाणा) तसेच गाजरवाडी उगाव, पिंपळगाव-बसवंत (ता.निफाड) या गावांमध्ये दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या ६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत तर वाके, निंबायते व चटाणेपाडा (ता.मालेगांव) येथील तीन तरुण शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या वसूलीला कंटाळून दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई, आर्थिक सहाय्य करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्र तसेच, नाशिक, त्र्यंबकेश्वर, मालेगांव, इगतपुरीसह अन्य तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे, बागायतींचे, मालमत्तेचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) नाशिक जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी दोन आत्महत्या पात्र व एक अपात्र आहे. दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून दोन्ही आत्महत्या मदतीसाठी पात्र आहेत. पात्र प्रकरणी रुपये १.०० लक्ष सानुग्रह अनुदान आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतची कार्यवाही सुरु असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पात्र प्रकरणी वारसांना रुपये १.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मधून**
**होणारी प्रवाशांची घट रोखण्याबाबत**

**(३८) * ३२४६० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.नारायण राणे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७१९१ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने सन २००३ पासून प्रवाशांच्या सुविधेसाठी वार्षिक रूपये २००/- भरून सवलत कार्डाची योजना बंद केली असून अशाच प्रकारच्या अनेक योजना महामंडळाने बंद केल्यामुळे प्रवासी संख्येत घट झाल्याने महामंडळाला मिळणारा उत्पन्न व महसूलीत घट झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाचे संचालक यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये लांबपल्याच्या ८०० फेऱ्या रद्द केल्या असून राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजनाअभावी महामंडळ तोट्यात आला असल्याचा आक्षेप महामंडळाच्या अहवालात महालेखापालांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, महामंडळाने प्रवाशांशी संबंधित किती योजना बंद केल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळातील प्रवासी संख्येत घट होऊ नये म्हणून महामंडळाने प्रवाशांसाठी बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाद्वारे वार्षिक रुपये २००/- भरुन सवलत कार्ड योजना दिनांक २२/०४/२०१७ पासून बंद करण्यात आली आहे. परंतू, त्यामुळे महामंडळाच्या प्रवासी संख्येत घट झालेली नाही. राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी संख्येत माहे एप्रिल व मे, २०१७ मध्ये प्रतिदिन ०.०५ टक्के ने वाढ झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) केवळ वार्षिक रुपये २००/- भरुन सवलत कार्डाची योजना बंद केली आहे. इतर कोणत्याही योजना बंद केलेल्या नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई व मुंबई उपनगरातील रस्त्यांची कामे खडीअभावी बंद झाल्याबाबत**

**(३९) * ३१४७२ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दगडखाणीवर हरित लवादाने बंदी आणल्याने मुंबई शहराला खडीचा पुरवठा बंद झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील दगडखाणीचा कंत्राट कालावधी संपल्यामुळे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी १०४ खाणी बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दगडखाणी बंद केल्यामुळे मुंबई व मुंबई उपनगरातील ५३८ रस्त्यांची कामे खडीअभावी बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर दगडखाणी पूर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दगडखाणीवर बंदी आणल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, ठाणे जिल्ह्यातील ७८ दगडखाणींची मुदत संपल्यामुळे व वन विभागाच्या जमिनीवरील २५ दगडखाणींना केंद्र शासनाकडून पर्यावरण अनुमती न मिळाल्यामुळे बंद आहेत. त्यामुळे मुंबई शहरात होणारा खडीचा पुरवठा माहे एप्रिल व मे, २०१७ मध्ये विस्कळीत झाला होता. मुंबईमध्ये सुरू असलेल्या एकूण ८१५ रस्त्यांच्या कामांपैकी ३८९ रस्त्यांची कामे जून, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण झाली आहेत. उर्वरीत रस्त्यांच्या कामाच्या निविदेनुसार रस्त्याची कामे करण्याचा कालावधी अद्याप संपलेला नसून, पावसाळ्याच्या कालावधीत सदर कामे स्थगित करण्यात आली आहेत. पावसाळ्यानंतर सदर रस्त्यांची कामे सुरू करण्यात येईल. ठाणे जिल्ह्यात सद्यस्थितीत ५८ दगडखाणी सुरू आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे संतोषनगर (ता.खेड, जि.पुणे) येथील शेड जळीत प्रकरणात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४०) * ३२९८४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे संतोषनगर (ता.खेड, जि.पुणे) येथील गट नं. २१६ मधील शेड जळीत प्रकरणात महसूल अधिकाऱ्यांच्या संगमताने बोगस पंचनामे करून संबंधित कंपनीने रुपये १५९ कोटी नुकसान भरपाई मिळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी (गृह शाखा) यांनी जा.क्र.पगस/कावि/१६२१/२०१६ दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उपविभागीय अधिकारी, खेड यांना चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय (गृह शाखा), पुणे यांनी दिनांक १९/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, खेड यांना तक्रारदार श्री.बाळासाहेब काळूराम चौधरी यांनी मा.पालकमंत्री, जि.पुणे यांना सादर केलेले निवेदन तपासून उचित कार्यवाही करण्याचे निदेश दिले होते व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.पालकमंत्री, जि.पुणे व तक्रारदारांना अवगत करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार तहसिलदार, खेड यांनी त्यांचेकडील दिनांक २३/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदार यांना मागणी केलेली कागदपत्रे, उपविभागीय अधिकारी, जुन्नर यांचेकडील बिनशेती आदेशाची प्रत, पंचनामे व संबंधितांचे जबाब उपलब्ध करुन दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टयात बेकायदा वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(४१) * ३२५२१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात सक्शन पंपाद्वारे वाळू उत्खननाला बंदी असतानाही संगमेश्वरसह (जि.रत्नागिरी) मंडणगड खाडीपट्टयात सक्शन पंपाद्वारे बेकायदा वाळू उत्खनन होत असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तपासणी करण्याऐवजी संबंधित विभागाचे निरीक्षकांनी शहर परिसरातील वाळू साठ्याची तपासणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत तसेच, वाळू उत्खनन करणा-या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सदर बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) संगमेश्वर व मंडणगड तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन/ वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस पडली आहेत. रत्नागिरी तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/ वाहतुकीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी उपविभागीय व तालुकास्तरावर भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. सदर भरारी पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत संगमेश्वर व मंडणगड तालुक्यातील वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या २१ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करून रुपये २४,४२,४००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोमा (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथे पशुचिकित्सालय व वैद्यकिय तंत्रज्ञ अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत

**(४२) * ३३७५७ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोमा (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) परिसरात शासकीय पशुचिकित्सालय व वैद्यकीय तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याने ३५० शेळ्यांचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याचे दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार चिमूर तालुक्यात अद्ययावत शासकीय पशुचिकित्सालय व वैद्यकीय तंत्रज्ञ अधिकारी नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) ता.चिमुर, जि.चंद्रपूर येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे दोन दवाखाने, श्रेणी-२ चे १२ आणि एक फिरते पशुचिकित्सालय अशी एकूण १५ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत आहेत. खडसंगी येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ वगळता अन्य सर्व दवाखान्यांतील पदे भरलेली आहेत.

दिनांक २० मे, २०१७ रोजी पशुसंवर्धन दिनाच्या कार्यक्रमामध्ये एकूण ६०० शेळ्यांना पीपिआर लसीकरण करण्यात आले आहे. सदर दिवशी एकही शेळी आजारी असल्याचे आढळले नाही.

तालुकास्तरावर पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, चिमुर तसेच जिल्हा स्तरावर शेळ्यांच्या आजाराबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तथापि, दिनांक २०/५/२०१७ ते दिनांक २७/५/२०१७ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यात तापमानाचा उच्चांक होता. सरासरी दैनिक तापमान ४७-४८ डि.से. दरम्यान होते. त्यामुळे सदर कालावधीत ६ शेळयांची (१ बकरा व ५ शेळ्या) मरतुक झालेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दैठणा (जि.परभणी) येथील अवैध खोदकामाबाबत**

**(४३) * ३३८५१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७९२१ ला दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दैठणा (जि.परभणी) येथील अवैध खोदकामाबद्दल तहसिलदार, परभणी यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रिलायन्स कंपनीला रूपये २ कोटी ६१ लाखांचा दंड ठोठावला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहित मुदतीत दंडाची वसुली न करणे, दंडाच्या ५० टक्के रक्कमाची भरपाई न घेता अपील स्विकृत करणे तसेच शासनाचे नुकसान व कंपनीचा फायदा या सर्व बाबी तहसलिदार व उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या संगनमताने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) तहसिलदार, परभणी यांच्या अधिनस्त पथकाने दिनांक १८/०१/२०१६ व दिनांक २२/०१/२०१६ रोजी गंगाखेड रोड ते परभणी रेल्वेगेट दरम्यानच्या रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात येणाऱ्या कामाची पाहणी केली असता, २ जेसीबींच्या सहाय्याने ६७०५ ब्रास मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तहसिलदार परभणी यांनी दिनांक १८/०१/२०१६ व दिनांक २२/०१/२०१६ रोजीच्या नोटीसीन्वये २ जेसीबी जप्त करून, दिनांक २६/०२/२०१६ रोजी सदर कंपनीला अवैध उत्खननाबाबत रुपये २,६१,४९,५००/- एवढ्या दंडात्मक रकमेबाबत आदेश पारित केले.

तहसिलदार, परभणी यांच्या सदर आदेशाविरूध्द संबंधितांनी उपविभागीय अधिकारी, परभणी व त्यानंतर अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे अपील अर्ज दाखल केले. सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक १३/०४/२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्यास्तरावर सुनावणी होवून निर्णयांवर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भूमि अभिलेख कार्यालय (ता.उमरेड, जि.नागपूर) येथे शेती व घराची मोजणी करताना शासनाच्या पैशाचा अपव्यय झाल्याबाबत**

**(४४) * ३१८०३ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमि अभिलेख कार्यालयाकडून (ता.उमरेड, जि.नागपूर) शेती अथवा घराची मोजणी करतांना साधारण मोजणी पावती फाडून तातडीची मोजणी करून शासनाच्या पैशाचा अपव्यय होत असल्याचा ठपका दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१६ च्या अंकेक्षण अहवालात ठेवण्यात आल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर व गैरप्रकार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रस्तूत प्रकरणी उपसंचालक, भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर कार्यालयाकडून दिनांक ०१/१०/२०१५ ते दिनांक ३०/०९/२०१६ या कालावधीत उप अधिक्षक भूमि अभिलेख, उमरेड कार्यालयाच्या काढण्यात आलेल्या वार्षिक निरीक्षण ज्ञापामध्ये, ज्ञाप कालावधीत काही साधारण मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निदर्शनास आले आहे. तद्नंतर दिनांक ०३/०३/२०१७ रोजी निरीक्षण ज्ञाप वाचनावेळी ई-मोजणी आज्ञावलीमध्ये नियोजनात अनधिकृत बदल केल्याचे दिसून आल्याने तसेच, या संदर्भात तालुका उमरेड येथील नागरिकांकडून प्राप्त तक्रारीची चौकशी करुन उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर, प्रदेश नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणातील संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु केली आहे.

-----------------

## राजेवाडीनजिक (ता.महाड, जि.रायगड) सावित्री नदीच्या नवीन बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * ३३५८८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजेवाडीनजिक (ता.महाड, जि.रायगड) सावित्री नदीवरील वाहून गेलेल्या पुलाच्या नवीन बांधकामात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोप केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुलाच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याची अभिलेख्यात नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यांत पशुसंवर्धन चिकित्सा केंद्र (पॉलीक्लिनिक) सुरू करण्याबाबत

**(४६) * ३४११२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात १६ पैकी केवळ ८ तालुक्यामध्ये पशुसंवर्धनचे चिकित्सा केंद्र (पॉलीक्लिनिक) सुरु असून आदिवासी तालुक्यांमध्ये पशुसंवर्धन संख्या असतांनाही पशुसंवर्धनचे चिकित्सा केंद्र (पॉलीक्लिनिक) नसल्यामुळे उपचाराअभावी जनावरे दगावत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) यवतमाळ जिल्ह्यात यवतमाळ येथे जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय तसेच, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड, घाटंजी, पांढरकवडा आणि वणी या तालुक्यांच्या मुख्यालयी तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय कार्यरत आहेत. उर्वरित आर्णि, झरी जामणी, मारेगांव, राळेगांव, बाभुळगांव, कळंब, नेर व महागांव या तालुक्यांच्या मुख्यालयी श्रेणी-१ चे पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत.

जिल्ह्यातील सर्व शासकीय पुशवैद्यकीय संस्थांमार्फत रुग्ण पशुंवर नियमितपणे उपचार केले जात असून, उपचाराअभावी आदिवासी भागातील जनावरे दगावल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैनगंगा नदीवरील (ता.पवनी, जि.भंडारा) अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(४७) * ३३३०४ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २९०८५ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा नदीपात्रातील (ता.पवनी, जि.भंडारा) रेतीचा रात्र-दिवस अवैधरित्या उपसा करुन जिल्ह्याबाहेर वाहतूक केली जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध उत्खननामुळे नदीपात्रात मोठे खड्डे पडले असून नदी पात्रातील रेतीचा अवैध उपसा व त्याची वाहतूक याकडे जिल्हा व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेतीचे अवैध उत्खनन रोखण्याबाबत स्थानिक नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदने देऊनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक १२/३/२०१३ मधील तरतुदींनुसार भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात सन २०१६-१७ या वर्षासाठी ५ रेतीघाटांचा लिलाव करण्यात आला असून, सदर रेतीघाटांतील बहुतांश रेती ही लिलावधारकांमार्फत भंडारा जिल्ह्याबाहेर इतर शहरांमध्ये विकली जाते.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील वैनगंगा नदीपात्रातून अवैध रेती चोरी होत असल्याबाबतचे दिनांक २६/०४/२०१७ रोजीचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी भंडारा यांच्याकडे दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार भंडारा जिल्ह्यातील रेतीघाटांची ड्रोनद्वारे पाहणी करण्यात आली असता, मौजे ईटगाव, ता.पवनी, मौजे वलनी, ता.पवनी, मौजे भोजापूर, ता.पवनी व मौजे मांगली-ईसापूर, ता.पवनी या रेतीघाटांवर यांत्रिक साधनांच्या सहाय्याने रेतीचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार अशा रेतीघाटधारकाकडील यांत्रिक साधने जप्त करण्यात आली आहेत. तसेच अपर जिल्हाधिकारी भंडारा यांनी दिनांक २३/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये संबंधित लिलावधारकांची सुरक्षा ठेव रक्कम जप्त करून शासनजमा करून लिलावधारकांमार्फत नव्याने सुरक्षा ठेव रक्कम शासनजमा होईपर्यंत रेतीघाट बंद केले आहेत. तसेच सदर रेतीघाटधारकांकडून रुपये १,२४,५४,०३०/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्याकरीता महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभाग यांचा समावेश असलेल्या भरारी पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ४८ प्रकरणांमध्ये कारवाई करून रुपये १८,७४,८००/- एवढ्या दंडाची रक्कम वसूल करून शासनजमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (नवी मुंबई) येथे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४८) * ३३४१७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई वाहतूक विभाग आणि तहसिलदार, पनवेल यांनी दिनांक १६ जून, २०१७ रोजी पहाटे पावणेपाच वाजता तळोजा गाव येथे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ३४ ट्रकवर कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रक मधून जप्त करण्यात आलेल्या ५०० ब्रास वाळूची किंमत रूपये सहा कोटी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील : (**१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे तळोजा येथे दिनांक १६ जून, २०१७ रोजी पहाटे पाच वाजताच्या सुमारास पोलीस उपायुक्त वाहतूक शाखा, नवी मुंबई व तहसिलदार पनवेल यांनी वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ३२ ट्रकांवर संयुक्तपणे कारवाई करून, सुमारे रूपये ४,०६,०००/- किंमतीची ११६ ब्रास वाळू जप्त केली आहे.

सदर प्रकरणी संबंधितांवर खारघर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

**प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा व टॅक्सीसाठी (काळ्या पिवळ्या) मोबाईल ॲप विकसित करण्याबाबत**

**(४९) * ३१६१२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रवासी वाहतूक करणाऱ्या ओला उबेरच्या धर्तीवर रिक्षा, टॅक्सी (काळ्या पिवळ्या) यांच्यासाठी मोबाईल ॲप विकसित करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन महिने होऊनही अद्याप ॲप विकसित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ॲप विकसित करुन सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) व (३) मोबाईल ॲप विकसनासाठी विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत दिनांक १३/०६/२०१७ व दिनांक ३०/०६/२०१७ रोजी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबईतील परळ येथील हाफकीन संस्थेच्या जागेवर टाटा मेमोरियल रुग्णालयाने वाहनतळ उभारल्याबाबत**

**(५०) * ३२२१८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील हाफकिन संस्थेकडील ५ एकर जागा मुंबईत कर्करोग रुग्णांची मोठी संख्या लक्षात घेऊन टाटा मेमोरियल सेंटरला बाल व महिला कॅन्सर रुग्णालय आणि हायड्रॉन बीम थेरपीसाठी सन २०१३ मध्ये हस्तांतरीत करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा मेमोरियलने चार वर्षे होवूनही या जागेवर रुग्णालय न बांधता वाहनतळ उभारले आहे तसेच सदर रुग्णालयाकडून हाफकीन संस्थेला रुपये २ कोटी येणे बाकी असून टाटा मेमोरिअल संस्थेला जागा देताना कोणकोणत्या अटी घालण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन टाटा मेमोरियलने कॅन्सर रुग्णालय व हायड्रॉन बीम थेरपीकरिता दिलेल्या जागेवर निर्धारित वेळेत रुग्णालय उभारण्याबाबत तसेच टाटा मेमोरियला सदर जागेची आवश्यकता नसल्यास सदरहू जागा हाफकिन संस्थेच्या ताब्यात देवून हाफकीन संस्थेचे रुपये २ कोटी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

तथापि, नंतर दिनांक २९/८/२०१६ रोजीच्या शुध्दीपत्रान्वये "हायड्रॉन बीम थेरपी" ऐवजी "रेडीओ थेरपी" असा प्रयोजनात बदल करण्यात आला आहे.

(२) सदर मिळकतीवर वाहनतळ उभारलेची बाब निदर्शनास आलेली नाही.

सदरहू जमीन टाटा मेमोरियल सेंटरला शासन निर्णय, दिनांक २१/२/२०१३ तसेच दिनांक ५/९/२०१३ च्या शुध्दीपत्रान्वये खालील प्रमुख अटी/शर्तीच्या अधिन राहून देण्यात आली आहे :-

१. राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील कर्करोग पिडीत कर्मचाऱ्यांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना सवलतीच्या दरात उपचारासाठी ५% खाटा राखीव ठेवणे सदर रुग्णालयावर बंधनकारक राहिल.

२. टाटा मेमोरिअल सेंटरला देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या हाफकीन संस्थेच्या जागेमध्ये संस्थेतील अधिकाऱ्यांची निवासस्थाने, विद्यार्थीच्या खोल्या, अतिथीगृहे व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने येत असल्याने पर्यायी इमारती बांधण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटरने रुपये ५.०० कोटी इतकी ठोक रक्कम हाफकीन संस्थेस द्यावी.

३. मंजूर केल्या जाणाऱ्या जमिनीचा प्रस्तावित वापर ५ वर्षामध्ये करणे संस्थेवर बंधनकारक करण्यात आले आहे.

४. शासनाच्या परवानगीशिवाय सदरहू जमीन किंवा तिचा कोणताही भाग गहाण ठेवता येणार नाही किंवा हस्तांतरित करता येणार नाही.

५. जमीन मंजूर करण्याच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास भाडेपट्टा रद्द करुन कोणत्याही भरपाईशिवाय व त्यावरील बांधकामासह जमीन परत घेण्याचा शासनास अधिकार राहिल.

(३) व (४) याबाबत संचालक, टाटा मेमोरियल सेंटर यांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयामार्फत दिनांक १५/७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर मिळकतीवरील बांधकामाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा करण्यात आलेली आहे. तसेच हाफकीन संस्थेस टाटा मेमोरियल सेंटर यांनी रुपये १.०० कोटी सुपूर्द केले असून उर्वरित रक्कम संस्थेला सुपूर्द करण्याबाबत महसूल व वन विभागाच्या दिनांक २९/८/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

-----------------

**कोंढवा उपनगर व पूर्व हवेली (जि.पुणे) तालुक्यातील टेकड्या व डोंगरांचे सपाटीकरण होत असल्याबाबत**

**(५१) * ३२३७१ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरालगतच्या कोंढवा उपनगर व पूर्व हवेली तालुक्यातील फुरसुंगी, भेकराईनगर, गंगानगर, ऊरुळी देवाची, वडकी, कोंढवा या गावांमधील गायरान व शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्यात येवून तालुक्यातील अनेक गावांमध्ये डोंगर व टेकड्यांचे सपाटीकरण करुन पर्यावरणाचा ऱ्हास भूमाफिया करीत असल्याचे माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जमिनीवर झालेले अतिक्रमण रोखण्याबाबत तसेच डोंगर व टेकड्याचे सपाटीकरण करुन पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या भू-माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात मौजे कोंढवा बुद्रुक, मौजे गुजरनिंबाळकरवाडी, मौजे मांगडेवाडी, येवलेवाडी व मौजे कात्रज या भागात माहे जून, २०१६ ते माहे जून, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खननाची १८ प्रकरणे दृष्टोत्पत्तीस पडली आहेत. तहसिलदार हवेली यांनी त्यापैकी ३ प्रकरणांमध्ये दंडात्मक आदेश पारित केले असून, उर्वरित १५ प्रकरणांमध्ये तहसिलदार, हवेली यांच्यास्तरावर नियमानुसार वसुलीची कारवाई करण्याची कार्यवाही सुरू आहे.

यात्व्यतिरिक्त हवेली तालुक्यात माहे जून, २०१६ ते माहे जून, २०१७ या कालावधीत निदर्शनास आलेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ६४ प्रकरणांमध्ये तहसिलदार हवेली यांनी कारवाई करून रुपये १,०८,३३,२२९/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

हवेली तालुक्यातील उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो किंवा कसे याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, पुणे यांच्याकडून जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी अहवाल मागविला असून, सदर अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील दरडक्षेत्र गाव-वाड्यांच्या पुनर्वसनासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(५२) * ३२४७१ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दरडक्षेत्र गाव-वाड्यांच्या पुनर्वसनासाठी रूपये ९५ कोटीचा निधी आवश्यक असल्याबाबतचा प्रस्ताव ४ वर्षापूर्वी शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८४, १९८९, १९९४ व २००५ मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने अद्यापही निधी उपलब्ध करून दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सन १९८४, १९८९ च्या महापुरामध्ये महाड तालुक्यातील गावे बाधित झालेली नव्हती. सन १९९४ मधील बाधित पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. सन २००५ मधील महाड तालुक्यातील १५ पूरग्रस्त गावांपैकी ५ गावांतील पुरग्रस्तांचे पुनर्वसन झाले आहे. २ गावांचे अंशत: पुनर्वसन झाले आहे. २ गावांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे तसेच उर्वरित ६ गावांमध्ये पुनर्वसनाची आवश्यकता नसल्याने पुर्नवसन करण्यात आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न महाड (जि.रायगड) तालुक्यातील नाही.

----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथील राज्य परिवहन मंडळाच्या आगाराची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५३) * ३१२३९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील राज्य परिवहन मंडळाच्या आगाराची इमारत सन १९७२ मध्ये बांधण्यात आली असून सदर आगाराच्या विश्रामगृहातील प्रसाधनगृह अस्वच्छ असणे, पाण्याची व्यवस्था नसणे, पिण्याच्या पाण्याच्या टाकी अस्वच्छ व दुषित असणे, आगार परिसरात पसरलेले घाणीचे साम्राज्य यामुळे कल्याण आगाराची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगारातील दुरवस्थेमुळे २५ चालक-वाहकांना काविळीची लागण होऊन एकाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्री विनायक पोलीस गृहनिर्माण संस्थेने निवासस्थानाकरिता मुंबईतील मुलुंड (पूर्व) येथील भूखंडाची मागणी केल्याबाबत**

**(५४) * ३२३३३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री विनायक पोलीस गृहनिर्माण (नियोजित) संस्थेच्या ३०० पोलीस कर्मचा-यांनी सन २००७ मध्ये मुलुंड (पूर्व) येथील सर्व्हे क्र. १०१ सिटी सर्व्हे क्र. १३१३ या भूखंडामधील दोन एकर जमीन रेडीरेकनर दराने मालकी हक्काचे गृह बांधणीसाठी मिळावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर संस्थेला जागा वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) श्री विनायक पोलीस गृहनिर्माण संस्थेने मौजे मुलुंड ता.कुर्ला येथील स.नं. १०१ व इतर (न.भू.क्र. १३१३ व इतर) मधील २ एकर जमीन सभासदांचे निवासस्थानाकरिता मिळणेकामी शासनाकडे दिनांक ३०/०६/२००८ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २२/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे मार्फत शासनास प्रस्ताव सादर केला होता. तथापि, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक २९/०३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर जमिनीचा प्रथम अभिन्यास तयार करण्याची कार्यवाही करून सविस्तर अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका व उपसंचालक, नगर रचना यांना अवगत केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील केळी बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(५५) * ३३८५२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांमध्ये दिनांक ५ मे, २०१७ व ३ जून, २०१७ रोजीच्या वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात केळी पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पिकांच्या नुकसान भरपाईसाठी क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडून पिकांचे पंचनामे करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पिकांची नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्यांकडून व लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) क्षेत्रिय स्तरावर तोंडी मागणी करण्यात आली आहे.

(४) सदर नुकसानीबाबत केलेल्या संयुक्त पंचनाम्यानुसार क्षेत्रिय स्तरावरुन निधी मागणीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील वाहकांची संख्या वाढविण्याबाबत**

**(५६) * ३१२७६ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) राज्य परिवहन मंडळाच्या आगारात वाहकांच्या कमतरतेमुळे अनेक बस फेऱ्या रद्द केल्यामुळे प्रवाशांना व चाकरमान्यांना त्रास होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देवगड आगारातील वाहकांची संख्या वाढवून नियमित वाहतुक सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) देवगड आगारामधील अत्यल्प भारमान विचारात घेऊन तसेच वाहकांची कमतरता विचारात घेऊन माहे मे, २०१७ मध्ये ५४ फेऱ्या रद्द केल्या होत्या. परंतू, फेऱ्या रद्द करताना प्रवाश्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता महामंडळाकडून घेण्यात आलेली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या सरळसेवा भरती सन-२०१७ अंतर्गत चालक तथा वाहक (कनिष्ठ) या प्रवर्गातील ७९२९ पदांसाठीची भरती प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

**कृषी विद्यापीठातील अध्यापकांना नियमित पदोन्नती मिळण्याबाबत**

**(५७) * ३१८४६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी आणि पशुवैद्यकीय विद्यापीठातील अध्यापकांना सेवा प्रगती योजनेतून (कॅस) नियमित पदोन्नती दिली जात नसल्यामुळे राज्यातील आणि बाहेरील कृषी आणि पशुवैद्यकीय विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून काम करण्याची संधी न मिळणे तसेच त्यांना पाचवा आणि सहाव्या वेतन आयोगाचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कृषी आणि पशुवैद्यकीय विद्यापीठातील अध्यापकांना नियमित पदोन्नती मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही,

सेवा प्रगती योजनेतून (कॅस) नियमित पदोन्नती देणे याबाबतची कोणतीही तरतूद महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ व परिनियम १९९० यामध्ये करण्यात आलेली नाही.

कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना खालील शासन निर्णयान्वये पाचवा वेतन आयोग व सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

पाचवा वेतन आयोग - शा.नि., दिनांक ३०/१२/१९९९

सहावा वेतन आयोग - शा.नि., दिनांक १८/०३/२०१०

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यापीठांतर्गत शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१० अन्वये सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी विषयक प्रश्नांबाबत उपाययोजना करण्याकरीता समितीने सादर केलेल्या अहवालानुसार अंमलबजावणी करण्याबाबत**

**(५८) * ३१८५५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विषयक प्रश्नांबाबत उपाययोजना करण्याकरीता नेमण्यात आलेल्या डॉ.एम.एस. स्वामीनाथन समितीने शासनास सादर केलेल्या अहवालास अनेक वर्षे होऊनही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डॉ.एम.एस. स्वामीनाथन समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे, अहवालातील शिफारशींवर अंतिमत: निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने नियुक्त केलेल्या प्रा.एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय आयोगाने शेतकऱ्यांसाठी केलेल्या देशातील सर्व शेतकऱ्यांसाठीचे राष्ट्रीय कृषी धोरण २००७ मध्ये केंद्र शासनाने प्रसिध्द केले. त्यातील ६६ शिफारशी राज्याशी संबंधित असून सदर शिफारशी जलसंधारण विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, कृषी व पदुम विभाग, जलसंपदा विभाग, नगर विकास विभाग, उद्योग विभाग, सहकार व पणन विभाग, महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग इत्यादि विभागांशी संबंधित असल्याने त्या विभागांना कळविण्यात आलेले आहे.

----------------

**अकोला शहरातील नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(५९) * ३४००९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय इमारतीचे बांधकाम मंजूर झालेले असून अद्यापपर्यंत बांधकामास सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी अनेकवेळा शासनाकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे सदर प्रादेशिक परिवहन कार्यालयाची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन प्रादेशिक कार्यालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) अकोला येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकरीता जागा ताब्यात घेतली असून, सदर जागेवर नवीन इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव व उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, क्रमांक-१, अकोला यांनी तयार केलेले अंदाजपत्रक प्राप्त झाली आहेत. सदर अंदाजपत्रकाची छाननी करून प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सुकसाळे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६०) * ३४२०१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकसाळे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील पाटीलपाडा ते नदी या रस्त्याची बांधकामानंतर दोन वर्षातच दुरवस्था झालेली असून अद्यापपर्यंत मोरींचे बांधकामही करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामाला किती निधी उपलब्ध करण्यात आला होता, रस्त्याचे बांधकाम केल्यानंतर रस्त्याचे आयुर्मान किती असते व हे काम कोणत्या ठेकेदाराला देण्यात आले होते,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या निकृष्ठ कामाबाबत ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**हटकावाडी (ता.मानवत, जि.परभणी) येथे अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(६१) * ३३१०६ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हटकावाडी (ता.मानवत, जि.परभणी) येथील गोदावरी नदीपात्रातील तसेच पूर्णा नदीपात्रातून रात्री-अपरात्री बेसुमार वाळू उपसा केल्यामुळे शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडत असल्याबाबतच्या तक्रारी सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच त्या भागातील ग्रामस्थांनी शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) परभणी जिल्हयातील मानवत तालुक्यातील मौजे हटकरवाडी या वाळूगटातून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याबाबतची दिनांक २३/०४/२०१७ रोजीची लोकप्रतिनीधींची तक्रार जिल्हाधिकारी, परभणी यांना प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार मानवत, जिल्हा खनिकर्म अधिकारी परभणी व तलाठी रामपूरी बु. यांनी सदर वाळूगटाची तपासणी केली असता, लिलावधारकांनी यांत्रिक साधनांच्या सहाय्याने वाळूचे अवैध उत्खनन करून २९७३.४३ ब्रास वाळूचा खाजगी जमिनीवर अवैधरीत्या साठा केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तहसिलदार, मानवत यांनी यांत्रिक साधनांच्या वापराप्रकरणी लिलावधारकांविरूध्द दिनांक १७/०५/२०१७ रोजी पोलीस ठाणे, मानवत येथे गुन्हा दाखल केला असून, अवैधरित्या यांत्रिक साधनाच्या वापरापोटी दंडात्मक रक्कम रुपये ३,००,०००/- वसूल करून शासनजमा केले आहेत. तसेच २९७३.४३ ब्रास वाळूच्या अवैध साठ्याप्रकरणी तहसिलदार, मानवत यांनी संबंधित शेतजमीन मालकांवर गुन्हे दाखल केले असून, त्यांच्या जमिनीवर रुपये ३५,३५,४०९/- एवढया रकमेचा बोजा चढविण्यात आलेला आहे. तसेच सदर चौकशीदरम्यान लिलावधारकांनी मंजूर परिमाणापेक्षा ५५५.४३ ब्रास अतिरिक्त वाळूचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार तहसिलदार, मानवत यांनी लिलावधारकांना नोटीस बजावली असून, जिल्हाधिकारी परभणी यांच्यास्तरावर सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायता (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे पशुवैद्यकीय दवाखाना उभारण्याबाबत**

**(६२) * ३१२४१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायता (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात अपूरी जागा, अपुरा कर्मचारी वर्ग, औषधांची कमतरता असल्याने वेळेत उपचार होत नसल्यामुळे सदर दवाखान्यावर अवलंबून असलेल्या गावपाड्यांतील शेतकऱ्यांचे पशुधन धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कल्याण तालुक्यातील गावपाड्यांतील पशुधनांची वाढती संख्या पाहता तेथे अद्ययावत पशुवैद्यकीय दवाखाना उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय. इमारत बांधकाम जागेसाठी ग्रामपंचायत, रायता, ता.कल्याण येथील दिनांक २८/०८/२००७ व दिनांक २३/०२/२०११ रोजी ग्रामसभेत सर्वे क्र. १०५ अंतर्गत २० गुंठे जागेचा ठराव घेऊन जागा उपलब्धतेचा प्रस्ताव दिनांक २९/०३/२०१२ रोजी महसूल व वन विभागाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आलेला असून जागा उपलब्धतेबाबत पाठपुरावा सुरू आहे. जागा उपलब्ध होताच या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे सांगवी, पो.नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शेत जमिनीवर अतिक्रमण व खोदकाम केल्याबाबत**

**(६३) * ३३६३४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांगवी, पो.नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या सर्व्हे क्र. ५२३ शेत जमिनीवर प्रविण मसाले कंपनीने अतिक्रमण व खोदकाम करुन शेतीचे नुकसान केल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, सातारा व पोलीस महासंचालक यांचेकडे दिनांक २३ जानेवारी, २०१३ व २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी लेखी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) श्री. चंद्रकांत विठ्ठल वीर या व्यक्तीने तहसिलदार, खंडाळा यांना या संदर्भात लिहिलेला दिनांक २३/१०/२०१५ रोजीचा अर्ज तहसिलदार कार्यालयात प्राप्त झाला होता. सदर अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्याने, अर्जासोबत अर्जदाराची जमीन स.नं. ५२३ चे गां.न.नं. ७/१२ उतारे न जोडल्यामुळे तसेच त्यांचे जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबतचा भू नकाशा न जोडल्यामुळे अर्जदारांना आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन फेर अर्ज सादर करण्याबाबत तहसिलदार, खंडाळा यांनी त्यांचे दिनांक ३०/११/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पश्चिम विदर्भातील (वऱ्हाड) दुधाची आवक घटल्याबाबत**

**(६४) * ३२६५६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील (वऱ्हाड) दुधाची आवक घटल्याने शासकीय दूध योजनांतील उत्पादन बंद होण्याच्या मार्गावर असून अकोला जिल्हयातील दुध पुरवठा बंद झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पश्चिम विदर्भातील शासकीय दूध योजना बंद पडू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे.

कृषकाळातील दूध उत्पादनात घट झाल्यामुळे व शासनाचे दूध खरेदी दर राज्यातील इतर सहकारी व खाजगी दूध प्रकल्पांच्या दूध खरेदी दराच्या तुलनेत (२१ जून, २०१७ पुर्वी) २ ते ४ रुपये प्रतिलिटर कमी होते. त्यामुळे शासकीय दूध योजना, अकोला येथे माहे मे, २०१७ दरम्यानच्या कालावधीत दुधाचा पुरवठा कमी झालेला होता. मात्र दूध पुरवठा बंद झालेला नव्हता.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय दूध योजना, अकोला येथे माहे मे, २०१७ दरम्यानच्या कालावधीत दुधाचा पुरवठा कमी झाल्यामुळे वितरणासाठी कमी पडत असलेले दूध शासकीय दूध योजना, वर्धा येथून उपलब्ध करुन घेण्यात आले. अशा प्रकारे अकोला येथील दैनंदिन दुधाचे सरासरी वितरण भागविण्यात आले आहे. शासनाने दिनांक २१/६/२०१७ पासून दूध खरेदी दरात रुपये ३/- प्रति लिटर वाढ केली असल्याने दुधाची आवक वाढणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीट (ता.करमाळा, जि.सोलापूर) गावातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(६५) * ३२६०८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीट (ता.करमाळा, जि.सोलापूर) गावामधील धनाजी चंद्रकांत जाधव (४५) या शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री आल्याशिवाय प्रेत जाळू नका अशी चिठ्ठी लिहून कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याचे दिनांक ८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या नावे रुपये ७५०००/- व त्यांच्या वडिलांच्या नावे रुपये ७८०००/- चे पीक कर्ज होते. जिल्हास्तरीय समितीमध्ये सदर प्रकरण पात्र ठरविण्यात आल्यामुळे वारसांना रुपये १.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू, तलासरी, पालघर (जि.पालघर) या तालुक्यात अवैध उत्खनन रोखण्याबाबत**

**(६६) * ३३६४८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, तलासरी, पालघर (जि.पालघर) या तालुक्यातील हायवेलगत असलेले नैसर्गिक डोंगर, टेकड्या जमीनदोस्त करण्यात येत असून नियमांचे उल्लघंन करून रेती उत्खनन सुरू असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू-पालघर तालुक्यात हायवेलगत नियम डावलून रेती उत्खनन, जमिनी सपाटीकरणाच्या नावाखाली बेसुमार माती उत्खनन, वृक्षांची कत्तल करून नैसर्गिक स्त्रोत बंद करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विकासाच्या नावाखाली डोंगरदऱ्या उद्ध्वस्त करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सालेकसा गल्लाटोला (ता.सालेकसा, जि.गोंदिया) या मार्गावरील खडकटोली नाल्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६७) * ३२१७७ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा गल्लाटोला (ता.सालेकसा, जि.गोंदिया) या मार्गावरील खडकटोली नाल्यावरील पूलाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे झाल्याने सदर पुलाची चार महिन्यात दुरवस्था झाल्याचे दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर काम पूर्ण होवून १ वर्षाचा कालावधी झालेला आहे. सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ अधिक असल्याने रपट्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी दबलेला आहे.

(२) सदर रपट्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून रपट्याच्या दबलेल्या भागाची दुरुस्ती करण्याची कार्यवाही कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजी (ता.केळापूर जि.यवतमाळ) परिसरात व वर्धा नदीच्या घाट परिसरातील अवैध उत्खनन रोखण्याबाबत**

**(६८) * ३४११३ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) करंजी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) परिसरात अवैधरित्या गौण खनिजांचे जेसीबीद्वारे उत्खनन व वर्धा नदीच्या घाट परिसरात अवैध रेती उत्खनन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील मौजे करंजी व परिसरात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक होत असल्याबाबतची बातमी दिनांक १७/०६/२०१७ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने दिनांक १९/०६/२०१७ रोजी मंडळ अधिकारी करंजी यांनी पथकासह मौजे करंजी व आजूबाजूच्या परिसरात मोका पाहणी केली असता गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, तहसिलदार, केळापूर यांनी माहे एप्रिल, २०१७ पासून आजपर्यंत केळापूर तालुक्यात निदर्शनास आलेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या २७ प्रकरणांमध्ये कारवाई करून रूपये २,८४,८००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधात्मक बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(६९) * ३३३०६ श्री.परिणय फुके, ॲड.अनिल परब, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण नगरपालिका हद्दीतील मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधात्मक बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे समुद्रातील पाणी स्थानिकांच्या घरात जाऊन जिवित व वित्तहानी होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्णावस्थेत असलेल्या बंधाऱ्याचे काम निधी मंजूर करून पूर्ण करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मे.बंदर अधिकारी वेंगुर्ला, बंदर निरीक्षक मालवण, पत्तन अभियंता, कुडाळ, सिंधुदुर्ग यांच्याकडे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहू धुपप्रतिबंधात्मक बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. परंतु मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत मंजूर करण्यात आलेल्या ३०० मी. लांबीच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम अपूर्ण नसून पूर्ण करण्यात आलेले आहे. त्या बंधाऱ्यालगतच्या किनाऱ्याची धूप होत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी उर्वरित भागाकरिता ४५० मी. लांबीमध्ये धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे आवश्यक आहे.

(२) होय.

(३) निधी व नियतव्ययाच्या अधीन राहून मेढा येथे धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मच्छिमारांच्या मागण्यांबाबत**

**(७०) * ३३४३३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांनाही कर्जमाफी देण्याबाबत तसेच इतर मागण्यांसाठी मच्छिमारांनी मा.मत्स्यविकास राज्यमंत्री यांच्याकडे अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने मा.मत्स्यविकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४/०६/२०१७ रोजी निवेदन दिले आहे, ही बाब खरी आहे.

(२) मत्स्योत्पादनाच्या प्राक्कलन पध्दतीत सुधारणा सुचविण्यासाठी मा.श्री.नकुल पाटील, तत्कालीन राज्यमंत्री (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार एखाद्या क्षेत्रात मासळीची टंचाई आहे किंवा नाही हे ठरवितांना त्या भागातील एका वर्षातील एकूण मत्स्योत्पादनाची तुलना गेल्या ३ वर्षातील सरासरी मत्स्योत्पादनाशी केली जाते. एकूण मत्स्योत्पादनात सरासरी मत्स्योत्पादनाच्या ५० टक्क्याहून अधिक घट असेल तर त्या क्षेत्रात मासळीची टंचाई जाहीर केली जाते. तथापि, गेल्या १० वर्षातील एकूण वार्षिक मत्स्योत्पादन सरासरी मत्स्योत्पादना इतकेच आहे. सबब कर्ज माफ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडघर-करंजाडे (ता.पनवेल, जि.रायगड) या पुलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७१) * ३२५०२ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यामधील ब्रिटीशकालीन वडघर-करंजाडे पुल हा ८९ वर्षे जूना असून वाहतुकीस धोकादायक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे ऑगस्ट, २०१६ पासून पूल वाहतूकीस बंद केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाची कोणतीही डागडुजी न करता सदर पुल पुन्हा वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला असल्यामुळे दुर्घटना होवून जीवीत हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) संबंधित पुल वाहतुकीस धोकादायक असल्याने पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या पुलाशेजारी सन २००६-२००७ मध्ये नविन पुल बांधण्यात आला आहे. सुरक्षिततेच्यादृष्टीने जुन्या पुलावरुन वाहतूक बंद करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत नवीन पुलावरुन वाहतूक सुरु आहे.

सदर रस्ता वडघर पुलासह सिडको प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग मेगासिटी शेजारील जमीन खरेदी प्रकरणाबाबत**

**(७२) * ३१४५८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३४७ ला दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गावरील रस्ते व मेगासिटीशेजारी उद्योगपती व आजी-माजी सनदी अधिकाऱ्यांनी खरेदी केलेली शेकडो हेक्टर जमीन प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१६ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात दिले असून त्याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत सर्व संबंधित विभागीय आयुक्तांना शासनाने कळविले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित असल्याचे नमूद केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्वासन देऊन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही अद्याप याप्रकरणाची चौकशी सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महामार्गाच्याशेजारी कोणकोणत्या उद्योगपतींनी तसेच आजी-माजी सनदी अधिकाऱ्यांनी किती हेक्टर जमिनी आपल्या नांवे अथवा आपल्या नातेवाईकांच्या नांवे खरेदी केल्या आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन खरेदी करणाऱ्या उद्योगपती तसेच सनदी अधिकाऱ्यांनी खरेदी केलेल्या जमिनींच्या कागदपत्रांची सखोल तपासणी करुन पुन:श्च जमिनी शासनाकडे जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) संबधित विभागीय आयुक्त यांच्याकडून अहवाल प्राप्त झाले असून, सदर अहवालाची तपासणी करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पशुसंर्वधन विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे राज्यातील ४८२३ शेतकरी अनुदानापासुन वंचित राहिल्याबाबत

**(७३) * ३१७७९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने व्हेंचर कॅपिटल फंड योजनेतून दुग्ध व्यवसाय, दुग्ध उद्योजक विकास योजना व कुकुटपालन व्यवसायासाठी सन २०१०-११ मध्ये अनुदान मंजूर करूनही पशुसंवर्धन विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे राज्यातील ४८२३ शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे २४ जिल्हा सहकारी बँकांनी न मिळालेल्या अनुदानावरही व्याज व मूळ कर्जावरील व्याजासहित रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल केले जात असल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील ५३९ शेतकऱ्यांना रूपये ५ कोटी ५८ लाख ९३ हजाराचे अनुदान मिळाले नसल्यामुळे कर्जावरील व्याजाचा भार शेतकऱ्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार केंद्र शासनाने मंजूर केलेले अनुदान शेतकऱ्यांना वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

दुग्ध व्यवसाय, दुग्ध उद्योजक विकास योजनेंतर्गत सन २०१०-११ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीचे विविध बँकांकडील प्रस्ताव मंजूरीस्तव नाबार्ड संस्थेकडे सन २०१६ मध्ये प्राप्त झाले होते. सदर प्रस्ताव पडताळणीसाठी आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे दिनांक २७/०१/२०१७, २/०३/२०१७ व ३०/०६/२०१७ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांची पडताळणी क्षेत्रियस्तरावर सुरू असून १४४३ प्रस्ताव पडताळणी पश्चात अनुदान वितरीत करणेस्तव नाबार्डकडे दिनांक ५/०७/२०१७ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. उर्वरित ३,३५७ प्रस्तावांची क्षेत्रियस्तरावर पडताळणी सुरू असून पडताळणी अहवाल प्राप्त होताच नाबार्डकडे पाठविण्यात येणार आहे.

पोल्ट्री व्हेंचर कॅपिटल फंड ही योजना दिनांक १/०४/२०११ पासून कार्यान्वित झाली असून त्या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत व अनुदान मंजूर करण्यात आलेले आहेत.

| वर्ष | मंजूर प्रकरणे | वितरीत अनुदान (रू.लक्ष) |
|---|---|---|
| २०११-१२ | १७ | ४२.५३९ |
| २०१२-१३ | १६ | ४३.२८ |
| २०१३-१४ | २०८ | ४२७.०८८ |
| २०१४-१५ | ० | ० |
| २०१५-१६ | ६१८ | १३४४.७६४ |
| २०१६-१७ | ३३९ | ८२७.६१८ |
| २०१७-१८ | ३४ | ७४.१५० |

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबई-अहमदाबाद जलदगती प्रवासी रेल्वे (बुलेट ट्रेन) प्रकल्पाबाबत**

**(७४) * ३१९१४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७४८० ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद हा जलदगती प्रवासी रेल्वे प्रकल्प (बुलेट ट्रेन प्रकल्प) रेल्वे मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन व गुजरात शासन यांच्याकडून संयुक्तपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी अंदाजे रूपये ९७६३९ कोटी खर्च येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खर्चापैंकी २५ टक्के भार राज्य शासनाने करण्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती, उक्त समितीच्या अहवालानंतर प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मंत्रीमंडळ उपसमितीने अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार राज्याच्या हिताच्या कोणत्या बाबी विचारात घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्याबाबत**

**(७५) * ३३१९४ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात यावर्षीच्या पेरणीच्या हंगामात १०६५४० मे. टन खताची मागणी शेतकऱ्यांकडून होत असताना फक्त ५९ हजार ७०० मे. टन खताचे आवंटन जिल्हा परिषद कृषी विभाग, हिंगोली यांनी मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खतांचा पुरवठा अल्प असल्याने एकाचवेळी मागणी वाढून खत टंचाईचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय

(२) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयातील मागील ३ वर्षातील खरीप हंगामातील एकूण सरासरी खत वापर ४८६१६ मे.टन इतका आहे. खरीप हंगाम २०१७ करीता मंजूर केलेला खत साठा ५९७०० मे.टन म्हणजे सरासरी खत वापराच्या २२% ने अधिक तर खरीप हंगाप २०१६ मधील खत वापराच्या तुलनेत ४०% ने अधिक आहे. सारांशाने शेतकऱ्यांना खत टंचाईचा सामना करावा लागला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) संबंधित नाही.

----------------

**इतर राज्यातील मच्छिमार राज्यात घुसखोरी करून मासेमारी करीत असल्यामुळे स्थानिक मच्छिमारांचा व्यवसाय धोक्यात आल्याबाबत**

**(७६) * ३१२४५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २६८०५ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर राज्यातील मच्छिमार राज्यात घुसखोरी करून पर्ससीन जाळ्याद्वारे बेकायदेशीर मासेमारी करीत असल्यामुळे पर्ससीन नेटद्वारे मासेमारीवर नियंत्रण व निर्बंध घालण्यासाठी शासनाने निर्णय घेतले असता सदर निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे पर्ससीन जाळ्याद्वारे मासेमारी होत असल्याने स्थानिक मच्छिमारांचे व्यवसाय धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरुड-जंजिरा (जि.रायगड) किनाऱ्यावर मासेमारी हा मोठा व्यवसाय असून मासेमारी व्यवसायावर ३० ते ३५ टक्के मच्छिमार अवलंबून असून या सर्व किनारपट्टीवर इतर राज्यातील मच्छिमारांनी घुसखोरी केली असल्याने सागरी सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परप्रांतीय मच्छिमारांकडे कोणतेही ओळखपत्र नाही. सदर परप्रांतीय मच्छिमार स्पीड बोटीचा वापर करून मासेमारी करीत असल्यामुळे इतर मासेमारी व्यवसायावर त्याचा परिणाम होत आहे, याबाबत स्थानिक मच्छिमारांनी अनेकवेळा आंदोलने करूनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**विधान भवन :**     **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.**     **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.